वर्ष : ०५ | अंक: ५० | मुंबई, मंगळवार ५ नोव्हेंबर २०१९ ते सोमवार ११ नोव्हेंबर २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब



मुंबईत ९६ टक्के रस्ते सदोष

3 → दोहोंतील विश्वासार्हता रसातळाला

शिवसेनेचा मुख्यमंत्री शिवतीर्थावर शपथ घेणार -संजय राऊत ← 4



# सत्ता स्थापनेबाबत शिवसेनेचं 'वेट ॲण्ड वॉच'

**मुंबई : विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून १२ दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी राज्यातला सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. सत्ता स्थापनेबाबत शिवसेनेने वेट अँड वॉच भूमिका घेतली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज पासून पुन्हा ओला दुष्काळ पाहणीसाठी मराठवाडा दौऱ्यावर जात आहेत.**



दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील दिल्लीला जाऊन केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीमध्ये पावसामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मिळावी, ही मागणी केल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. या बैठकीत राज्यातल्या राजकीय परिस्थितीवरही चर्चा झाली.

शिवसेनेशी पुढील बोलणी राज्यस्तरावरील नेत्यांनीच करावी असे आदेश अमित शाहांनी दिल्याचं वृत्त आहे. भाजपाचं केंद्रीय नेतृत्व सत्तास्थापनेत हस्तक्षेप करणार नाही, मुख्यमंत्र्यांनीच शिवसेनेशी डील करावं असे आदेश अमित शाहांनी दिल्याचं समजतंय.

मुख्यमंत्रिपदाबाबत उद्धव ठाकरेंशी बोलणं झालेलं नव्हतं असं भाजपा अध्यक्ष अमित शाहांनी मुख्यमंत्र्यांना दिल्लीतल्या बैठकीत सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. तसंच शिवसेनेला मुख्यमंत्रिपद आणि गृहमंत्रिपद देण्यास अमित शाहांनी नकार दिल्याचंही सूत्रांनी सांगितलंय. अमित शाह यांच्या या भूमिकेमुळे पाच आणि सहा नोव्हेंबरला होणारा शपथविधी बारगळण्याची शक्यता आहे. अमित शाहांची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन सरकार लवकरच स्थापन करणार असल्याची माहिती दिली. मात्र यावेळी त्यांनी सत्तासमीकरणावर भाष्य करण्याचं टाळलं. सत्तासमीकरणावर बोलणार नाही. तसंच भाजपातलंही कुणी बोलणार नाही. मात्र नवीन सरकार लवकरच स्थापन करणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी शिवसेना अथवा महायुतीचा उल्लेख टाळला.

## सरकार भाजप नव्हे, तर शिवसेनेचे येणार; जयंत पाटलांच्या वक्तव्याने भूवया उंचावल्या!



महाराष्ट्रातील सत्ता स्थापनेचा घोळ काही केल्या सुटत नाही असे दिसत असताना राष्ट्रवादीचे शिवसेना प्रेम उफाळून आल्याने भाजपचे टेन्शन वाढले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत सरकार भाजपचे नाही, तर शिवसेनेचे येणार असल्याचे वक्तव्य करत शक्यतांचा अजून एक बॉम्ब फोडला. तसेच त्यांनी भाजपने शिवसेनेचे आमदार फोडले, तर आम्ही पोटनिवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा देऊन शिवसेनेचाच आमदार पुन्हा निवडून आणू असे वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्याने पडद्यामागे काय घडामोडी घडत असतील याची उत्सुकता अधिकच ताणली गेली आहे.




# स्कूलबसबाबत जबाबदारी झटकल्यास कारवाईचा इशारा; वाहतूक शाखेचे पत्र

**मीरा रोड : मीरा-भाईंदरमधील शाळा व्यवस्थापनांना वाहतूक पोलिसांनी पत्र पाठवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने शाळेच्या बस सुस्थितीत ठेवण्यासह आवश्यक त्या उपाययोजना व खबरदारी घेण्यास सांगितले आहे. पत्राची गांभीर्याने दखल घेण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.**

भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी शाळेची बस धोकादायक अवस्थेत चालवली जात असल्याचे वृत्त आहे. या शाळेच्या बसची मागची काच नसतानाही विद्यार्थ्यांची वाहतूक केली जात होती. या मुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याने पालकांसह शहरातील नागरिकांमध्ये अशा बेजबाबदार शाळा व्यवस्थापनां विरोधात संताप व्यक्त होत होता. वाहतूक पोलिसांनीही या बसवर दंडात्मक कारवाई करुन हजार रुपयांचा दंड वसूल केला होता. त्या नंतर व्यवस्थापनाने बसची मागची काच तातडीने लाऊन घेतली होती.



या घटनेची वरिष्ठांपासून गंभीर दखल घेण्यात आल्यानंतर वाहतूक पोलीस निरीक्षक अनिल पवार यांनी शहरातील सर्वच शाळा व्यवस्थापनांना पत्र पाठवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यास बजावले. शाळेतील सर्व बस सुस्थितीत ठेवण्यात याव्यात, बसचालक आणि केअर टेकर यांनी वाहन चालवताना, मुलांना वाहनातून उतरवताना व चढवताना त्यांची विशेष काळजी घ्यावी, शाळेची बस चालवताना सिग्नल तोडू नये, सीट बेल्ट लावणे, वेगाने वाहन चालवू नये व वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे असे शाळा व्यवस्थापनांना बजावले आहे. बसचालकाचे चारित्र्य पडताळणी करून त्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावेत. चालकाचा परवाना, बॅच, बसची आवश्यक सर्व कागदपत्रे आदींची पडताळणी करून मगच वाहनचालक आणि केअर टेकरची नेमणूक करावी असे शाळांना कळवण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक पवार यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड खपवून घेणार नाही. शाळांनी नियमांचे काटेकोर पालन करून आपली जबाबदारी टाळली तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असा इशारा पवार यांनी दिला आहे.

# मुंबईला सर्वात मोठा धोका!




**नवी दिल्ली - समुद्रातील पाण्याचा पातळी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळं जगभरातील बरेच देश संकटात आहेत. हा पाण्याची पातळी सतत वाढत असल्यामुळं २०५० पर्यत जगभरातील अनेक शहरांवर याचा विपरीत परिणाम होणार आहे. दरम्यान नुकत्याच एका रिचर्समध्ये याबाबत अभ्यास करण्यात आला. त्यानुसार, पाण्याची पातळी वाढल्यामुळं जगभरातील १५ कोटी लोकांना याचा फटका बसणार आहे. काही वर्षांनंतर या १५ कोटी लोकांकडे राहण्याची सोयही नसणार आहे.**

या रिचर्सनुसार समुद्रातील पाण्याच्या वाढत्या पातळीमुळं मुंबई शहर पूर्णपणे नष्ट होऊ शकते, असा धक्कादायक खुलासा करण्यात आला आहे. या रिचर्समध्ये शास्त्रज्ञांनी सॅटेलाइटमधून आलेल्या फोटोंवरून हा निकष काढला आहे. न्यूयॉर्क टाइम्सनं दिलेल्या बातमीनुसार, सॅटेलाइटच्या मदतीनं समुद्रातील पाण्याच्या पातळीची गणना करण्यात आली आहे. यावरून ही पातळी वाढत असल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले आहे. हा रिसर्च प्रतिष्ठित जर्नल नेचर कम्युनिकेशननं प्रकाशित केला आहे.

### शांघायवरही मोठे संकट

आशियाई खंडातील सर्वात प्रगतशील असा शांघाय पूर्णपणे पाण्याखाली जाऊ शकतो. या शहराच्या आसपास असणाऱ्या शहरांमध्येही पाणी शिरू शकते. या रिचर्सनुसार कमीत कमी ११ कोटी लोकांचे पुर्नवसन करावे लागेल, यासाठी तयारी करण्याची गरज शांघायला आहे. रिचर्स करणारे जुडे स्ट्रॉस यांनी, शांघायमध्ये अशी परिस्थिती आली तर, लोकांना वाचवणे जास्त कठिण असणार आहे. २००५मध्ये कॅटरिना नावाचे वादळ आले होते, त्यावेळी अशीच परिस्थिती होती.

### ॲलेक्झेंड्रिया २०५०पर्यत राहणार नाही

ॲलेक्जेंड्रिया या देशावरही २०५० पर्यंत मोठे संकट येऊ शकते, असा धक्कादायक खुलासा करण्यात आला आह. ॲलेक्झेंड्रिया हा देश ॲलेक्झांडरच्या नावावर ठेवण्यात आले आहे. ॲलेक्झांडरनं या शहराचा शोध लावला होता, त्यामुळं येथे असलेल्या सांस्कृतिक ठेवी नष्ट होऊ शकतात. यानंतर सर्वात मोठ्या इराक देशालाही पाण्याचा स्तर वाढीचा फटका बसू शकतो.

### संपूर्ण मुंबई जाणार पाण्याखाली

**या रिचर्सनुसार भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईचा संपूर्ण विनाश होणार आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे मुंबईचा बहुतांश भाग हा पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी मायग्रेशन संस्था कॉर्डिनेटर डायना लोनेस्को यांनी दिलेल्या माहितीत, मुंबईतील लोकांना वाचवण्यासाठी अजूनही योजना आखल्या जाऊ शकतात. त्यासाठी आतापासून तयारीला सुरुवात करणे गरजेचे आहे, असे सांगितले.**



# स्वच्छ सुंदर मिरा-भाईंदर आपले शहर

मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या दुर्लक्षामुळे मिरा भाईंदर नवघर रोड स्थित सचिन तेंडुलकर मैदानाची दुर्दशा पहायला मिळते. येथे जवळच पोलिस चौकी असतानाही सदर परिसरात स्थानिक लहान मुलांना, जेष्ठ नागरीकांना परीसरात वावरणे धोकादायक बनले आहे. दिवसाढवळया सदर मैदानात गर्दुले येथे दहशत माजवत आहेत. येथे काही व्यसनी मुले मुली राजरोसपणे चरस अफू गांजा तसेच दारु पिताना दृष्टीस पडतात. सतत गजबजलेल्या या परिसरात नशा करणाऱ्या मुलांची संख्या मोठया प्रमाणात पहावयास मिळते. येथे पोलिसांचा कोणताही पहारा नसतो यामुळे सदरच्या मैदानात मुलांना खेळण्यासाठी जागा मिळत नाही . यातच नगरपालिका लक्ष घालत नाही. सोशल राईट्स संस्थेमार्फत अनेक वेळा तक्रारी करुनही दुर्लक्ष करण्यात येते. विशेष म्हणजे नशा करणारी मुले स्थानिक नसून बाहेरुन येथे येतात. व सदर



मैदानात दारुच्या बाटल्या फोडून विकृती असल्यासारखे काचा पसरवून जातात . हा प्रकार मागील एक वर्षापासून राजरोसपणे सुरु आहे. याकडे पोलिसांचे लक्ष नाही तसेच कोणती कारवाई नाही . येथील स्थानिक लोकांनी अनेकवेळा तक्रारी करुनही कोणीही दाद देत नाही. मिरा भाईंदरला खेळण्याचे मैदान सुरक्षित नाही. याउलट मैदाने टेंडरवर आपल्या आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना देण्याचा सपाटा लागला आहे. लोकार्पण केलेल्या मैदानावर महानगरपालिकेने पैसे कमवण्याचा धंदा सुरु केला आहे. अशी प्रतिक्रिया येथील स्थानिक मंडळी करतात. राजकरणी लोक येथे फिरक्तानाही दिसत नाही. येथे गटबाजी जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे स्थानिक मंडळी बोलण्यास घाबरतात. नशा करणाऱ्या मुलांकडून येथील स्थानिकांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे.



# कांदा खाल्ला नाही म्हणून कोणी मरत नाही -सदाभाऊ खोत

**कोल्हापूर-** राज्यभरात परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलं आहे. नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. कोकणातही भातशेतीला परतीच्या पावसाचा फटका बसलाय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मंत्र्यांना शेतकऱ्यांची भेट घेऊन नुकसानीची पाहणी करण्याचे आदेश दिले. राज्याचे कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेले असताना, एका विधानामुळे चर्चेत आले आहेत.

कांदा खायचा असेल तर ५०-६० किलो दराने घेऊन जा. कांदा खाल्ला नाही म्हणून कोणीही मरत नाही, विनाकारण ओरड थांबवा ! असं संतप्त मत सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केलं आहे. ते निफाड तालुक्यातील कोळवाडी येथील गावात शेतीच्या नुकसानीची पाहणी करायला गेले होते. 'परतीच्या पावसाने यंदा



कांद्याला मोठे नुकसान होणार आहे. परिणामी कांद्याचे दर वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत कांदा ५०-६० रुपये किलो दराने खावा लागला, तर खुशाल खाल्ला पाहिजे. कांदा खाल्ला नाही म्हणून कोणी मरत नाही.' ऊन्९ मराठीने वृत्तवाहिनीने यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

परतीच्या पावसाने निफाड तालुक्याला सोमवारी अक्षरशः झोडपून काढले आहे. यात द्राक्षबागा, कांदा, भुईमूग, बाजरी, मका, सोयाबीन या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी सदाभाऊ खोत शुक्रवारी नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले होते. यावेळी निफाड तालुक्यातील कोळवाडी येथील कोंडाजी पुंजा शिंदे या शेतकऱ्याच्या द्राक्ष बागेत जाऊन त्यांनी नुकसानीची पाहणी केली.

# लोकसभेच्या तुलनेत विधानसभेत काँग्रेसचे मताधिक्य अडीच लाखांनी घटले

**चंद्रपूर-** लोकसभेच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व भाजपा या दोन्ही पक्षाचे मताधिक्य मोठट्या प्रमाणात घसरले आहे. चंद्रपूर- वणी- आर्णी लोकसभा क्षेत्रांतर्गत सहा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे मताधिक्य विक्रमी २ लाख ५१ हजार ३०९ मतांनी कमी होणे ही काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार बाळू धानोरकर यांच्यासाठी धोक्याची घंटा आहे. अवघ्या सहा महिन्यात इतक्या प्रचंड प्रमाणात मताधिक्य कमी झाल्याने मतदारांमध्ये धानोरकर यांच्याविषयी उघड नाराजी दिसून येत आहे.



चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील सहा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येकी तीन विधानसभा काँग्रेस व भाजपाने जिंकल्या. २०१४ मध्ये भाजपा- शिवसेना युतीचे सहा आमदार होते. तर काँग्रेसचा एकही आमदार नव्हता. मात्र २०१९ च्या विधानसभेत दोन्ही पक्षाचे तीन आमदार विजयी झाले तर भाजपाचे दोन आमदार पराभूत झाले. तीन आमदाराने संख्याबळ वाढल्याने काँग्रेस पक्षात उत्साहाचे वातावरण असले तरी लोकसभेच्या तुलनेत काँग्रेस पक्षाचे मताधिक्य २ लाख ५१ हजार ३०९ मतांनी कमी झाले आहे. सहा महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे बाळू धानोरकर यांना विक्रमी ५ लाख ५९ हजार ५०७ तर भाजपाचे हंसराज अहीर यांना ५ लाख १४ हजार ७७४ मते मिळाली होती. धानोरकर यांनी अहीर यांचा ४४ हजार ७३३ मतांनी पराभव केला होता. परंतु विधानभेत भाजपाच्या तुलनेत काँग्रेसचे मताधिक्य कमी झाले आहे. लोकसभा अंतर्गत येणाऱ्या चंद्रपूर, बल्लारपूर, राजुरा, वरोरा, वणी व आर्णी या सहा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला ३ लाख ८ हजार १९८ मते मिळाली तर भाजपाला ३ लाख ८३ हजार ९५ मते आहेत. लोकसभेत राजुरा विधानसभेत काँग्रेसला १ लाख ९ हजार १३२ तर भाजपाला ७३ हजार ८८० मते मिळाली होती. चंद्रपूरमध्ये काँग्रेसला १ लाख ३ हजार ९३१ तर भाजपाला ७८ हजार १८७, बल्लारपुरात काँग्रेस ९६ हजार ५४१ तर भाजपा ६५ हजार ४८० मते मिळाली होती. वरोऱ्यात काँग्रेस ८८ हजार ६२७, भाजपा ७६ हजार १६७, वणीमध्ये काँग्रेसला ९० हजार ३६७ तर भाजपा ९२ हजार ३६५ व आर्णीत काँग्रेस ६८ हजार ९५२ तर भाजपा १ लाख २६,६४८ मते मिळाली होती.

# मिठागराचा भूखंड मोकळा होणार!

**मुंबई-** २०२२ पर्यंत 'सर्वासाठी घरे' या योजनेंतर्गत पूर्व उपनगरातील मिठागराचा ३५० एकर भूखंड खुला करून तो एका बडट्या विकासकाला परवडणाऱ्या घरांचा प्रकल्प राबविण्यासाठी देण्यात येणार आहे. निवडणुकीपूर्वी हा निर्णय घेण्यात आला असून नवे सरकार स्थानापन्न होताच त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे. विकास आराखडट्यातही सव्वापाच हजार एकर भूखंडावर दहा लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून हा त्याचाच भाग असल्याचे या घडामोडींशी सूत्रांनी सांगितले.

पूर्व उपनगरात घाटकोपर, चेंबूर, तुर्भे, ट्रॉम्बे, मंडाले, आणिक, वडाळा, कांजूरमार्ग, भांडुप, नाहूर, मुलुंड तर पश्चिम उपनगरात मालवणी, दहिसर, मीरा-भाईंदर, विरार आदी ठिकाणी मिठागरे आहेत. मात्र यापैकी बहुसंख्य ठिकाणी मिठाचे उत्पादन थांबलेले आहे. पूर्व उपनगरात असलेल्या मिठागराच्या एक हजार एकरचा पट्टा परवडणाऱ्या घरांसाठी उपलब्ध करून देण्याची घोषणा २०१६ मध्येच विद्यमान भाजप सरकारने केली होती. मात्र त्यात अडचणी होत्या. मिठागराचा भूखंड हा केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय होता. तसेच सागरी हद्द नियंत्रण कायद्यातील तरतुदीमुळे हा परिसर संपूर्णपणे 'ना विकसित क्षेत्रा'त मोडत होता. अलीकडेच केंद्र सरकारने सागरी हद्द नियंत्रण कायद्यात शिथिलता आणल्यामुळे (भरतीरेषेपासून



५० मीटर ही मर्यादा आणल्याने) एक हजार एकरचा भूखंड परवडणाऱ्या घरांसाठी उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यापैकी ३५० एकर भूखंड परवडणाऱ्या घरांच्या योजनेसाठी उपलब्ध करून दिला जाणार आहे. हा भूखंड एका बडट्या विकासकाला पंतप्रधान आवास योजनेंतर्गत परवडणारी घरे बांधण्यासाठी दिला जाणार आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या अखत्यारीतील राज्यातील भूखंड राज्य सरकारला विकसित करण्यासाठी मिळावेत, यासाठी घटनेत आवश्यक ते बदल करण्याबाबतही राज्य सरकारने केंद्राकडे पाठपुरावा केला होता. त्यालाही हिरवा कंदील मिळाला आहे. त्यामुळेच मिठागराचा भूखंड उपलब्ध करून देऊन त्यावर परवडणाऱ्या घरांसाठी योजना राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मिठागरे (जतन आणि व्यवस्थापन) नियम २०१७ मध्ये बदल करण्यात आल्यामुळे आता मिठागरे हा दर्जा नष्ट झाला आहे. त्यामुळे मिठागरांच्या भूखंडाचा विकास करण्यास मुभा मिळाली आहे, असेही गृहनिर्माण विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच सरकार स्थानापन्न होण्याची शक्यता असल्यामुळे हा निर्णय आता नव्या सरकारकडून घेतला जाणार आहे. बीडीडी चाळींचा प्रकल्प राबविणाऱ्या एका बडट्या विकासकालाच हा भूखंड विकसित करण्यासाठी देण्यात येणार आहे.

# पोलिसांच्या 'खाकी'तील छटाभेद बंद!

**मुंबई-** 'खाकी वर्दीतली माणसे' म्हणून पोलीस दलाकडे पाहिले जात असले तरी, शिपाई ते साहाय्यक उपनिरीक्षकापर्यंतच्या कर्मचाऱ्यांच्या गणवेशातील खाकीच्या वेगवेगळट्या छटा या नेहमीच खटकत असतात. विशेषत: पोलीस संचलनाच्या वेळी गणवेशाच्या कापडाच्या या भिन्न छटा ही विसंगती अधिक ठळकपणे दाखवून देतात. या पार्श्वभूमीवर, पोलिसांच्या गणवेशासाठी एकच छटा असलेले खाकी कापड वापरण्याचा निर्णय राज्य पोलीस दलाने घेतला आहे.



पोलीस मुख्यालयाकडून यासाठी कापडखरेदी केली जाणार आहे.

राज्य पोलीस दलातील सव्वा दोन लाख कर्मचाऱ्यांपैकी दोन लाखांच्या आसपास शिपाई ते सहायक उपनिरीक्षक आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना गणवेशासाठी दरवर्षी पाच हजार १६७ रुपये दिले जात असत. या रकमेत पोलिसांनी गणवेशासाठी कापड खरेदी करणे, शिलाई तसेच काठी खरेदी करणे अपेक्षित आहे. ही रक्कम अपुरी असली तरी पोलिसांना याच रकमेत किमान दोन गणवेश तयार करावे लागत असत. बऱ्याच वेळा पदरमोड करूनही पोलिसांना गणवेशाची व्यवस्था करावी लागत असे. अशा वेळी या पोलिसांकडून कमी दर्जाचे कापड खरेदी केले जात असे. त्यामुळे प्रत्येक पोलिसाच्या खाकीची रंगछटा बदलत असे. तो एकच असावा, असे राज्य पोलीस दलाला वाटत असून त्यातूनच गणवेशासाठी विशिष्ट दर्जाचे कापड खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आल्याचे राज्य पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. गणवेशासाठी कापड आणि विशिष्ट काठी पुरविली जाणार असल्यामुळे दरवर्षी पोलिसांना मिळणारा भत्ता बंद केला जाणार असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.

# ऑक्टोबर महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा १२५ टक्के अधिक पाऊस

**मुंबई-** पावसाचा लांबलेला परतीचा प्रवास, आर्द्रतेचे प्रमाण कमी न होणे, अरबी समुद्रात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणि महा चक्रीवादळ या हवामानातील बदलांमुळे पावसाचा मोसम (जून ते सप्टेंबर) संपल्यानंतरही १ ते ३० ऑक्टोबर या काळात राज्यात सरासरीपेक्षा १२५ टक्के अधिक पाऊस झाला. जालना जिल्हट्यात सरासरीपेक्षा सर्वाधिक (३२८ टक्के) पावसाची नोंद झाली.

हवामान विभाग १ जून ते ३० सप्टेंबर या काळातील पावसाची आकडेवारी ही मोसमातील नोंदी म्हणून गृहीत धरते. मात्र त्यानंतरही ऑक्टोबरमध्ये जोरदार पाऊस झाला. पावसाचा परतीचा प्रवास लांबल्यामुळे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडट्यात मराठवाडट्यात पावसाने हजेरी लावली होती. नंतरच्या काळात अरबी समुद्रात तयार झालेले महा चक्रीवादळ (कयार) यामुळे परतीच्या काळात अनेक ठिकाणी पावसाच्या नोंदी झाल्या. परतीचा प्रवास संपताना १६ ऑक्टोबरला लगेचच ईशान्य मोसमी वाऱ्यांनी तमिळनाडूत हजेरी लावली. त्यामुळे



आर्द्रतेचे प्रमाण कमी होण्यास वाव मिळाला नाही, त्याच वेळी तापमानात वाढ झाल्यामुळे मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडट्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. ऑक्टोबर महिन्यात मराठवाडट्यातील बहुतांश जिल्हट्यांमध्ये सरासरीपेक्षा २०० टक्क्यांहून अधिक पावसाची नोंद झाली. बदललेल्या हवामानामुळे देशातील दहा राज्यांमध्ये १ ते ३० ऑक्टोबर या काळात सरासरीपेक्षा खूप जास्त (६० टक्क्यांपेक्षा अधिक) पावसाची नोंद झाली. गुजरातमध्ये सरासरीपेक्षा २२० टक्के अधिक, तर राजस्थानमध्ये १२३ टक्के अधिक पाऊस पडला. पावसाच्या दीर्घकालीन पूर्वानुमानानुसार राज्यात ७ नोव्हेंबपर्यंत अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्हट्यांमध्ये जोरदार वारे आणि मेघगर्जनेसह विजा चमकून मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. तर पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, नंदुरबार जळगाव, नाशिक, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, हिंगोल, लातूर आणि उस्मानाबाद जिल्हट्यांत गडगडाटासह पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. एकाच वेळी दोन चक्रीवादळांची शक्यता

'कयार' या महा चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली असून त्याचे रूपांतर अतितीव्र चक्रीवादळात झाले आहे. बुधवारी त्याचा प्रवास ओमानच्या (मुंबईपासून ११६० किमी) दिशेने सुरू आहे. त्याच वेळी हिंदी महासागरात कोमरान आणि मालदीवच्या दरम्यान तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र लक्षद्वीपच्या दिशेने सरकत असून पुढील चोवीस तासांत त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

# मुंबईत ९६ टक्के रस्ते सदोष

**मुंबई-** मुंबईतील रस्त्यांची किती दुरवस्था झाली आहे याचा पुरावा खुद्द महापालिकेच्या दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत समोर आला आहे. दक्षता विभागाच्या अधिकाऱ्यांनी सप्टेंबर महिन्यात केलेल्या रस्त्यांच्या पाहणीत तब्बल ९६ टक्के रस्ते वाईट अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे. रस्ता तयार केल्यापासून तीन वर्षांच्या आतच हे रस्ते खराब झाल्याचे आढळून आले आहेत, हे कालावधी असतो. त्यात रस्त्याची देखभाल करण्याची जबाबदारी त्या कंत्राटदारांची असते. परंतु, निकृष्ट काम आणि देखभालीकडे झालेले दुर्लक्ष यामुळे नवीन रस्ते असूनही त्यांची दुरवस्था झाली होती.

५८ कंत्राटदारांपैकी ४१ कंत्राटदार यामध्ये दोषी आढळले असून त्यांनी कारणे दाखवा नोटिसा पाठवण्यात आली आहे. दरम्यान, २०१५ मध्ये पालिकेने रस्ते विभागातील घोटाळ्याची चौकशी



विशेष.

खड्डे बुजवण्यासाठी एका बाजूला पालिकेने खड्डे दाखवा ५०० रुपये बक्षीस मिळवा, अशी योजना आणून एक प्रकारे मुंबईतील रस्ते चांगले नसल्याचेच मान्य केले आहे. पालिकेच्या दक्षता विभागाने केलेल्या रस्त्यांच्या पाहणी अहवालातही यावर शिक्कामोर्तब झाले आहे. विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी स्थायी समितीमध्ये हा अहवालच सादर केला. दक्षता विभागाच्या अभियंत्यांनी सप्टेंबरमध्ये शहरातील ३८, पश्चिम उपनगरातील ११८ व पूर्व उपनगरातील ३८ रस्त्यांची तपासणी केली. हे सगळे रस्ते हमी कालावधीतील होते. रस्ता तयार केल्यानंतर तीन वर्षांपर्यंत हमी केली होती व दोषी कंत्राटदार आणि पालिकेचे अभियंते यांच्यावर कारवाई केली होती. मात्र त्यातून कंत्राटदार व अधिकारी यांनी काहीही शिकवण घेतलेली नाही, असा आरोप रवी राजा यांनी केला आहे. या ४१ कंत्राटदारांना यापुढे कोणतेही काम देऊ नये, त्यांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी रवी राजा यांनी केली आहे.

दक्षता विभागाच्या पाहणीत रस्त्यांचा पृष्ठभाग, उपयोगिता वाहिन्यांसाठी खणलेले खड्डे, रस्त्यावरचे खराब पट्टे, पदपथ, मॅनहोलच्या आजूबाजूचा भाग यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १९४ पैकी १८७ रस्ते दुरवस्थेत असल्याचे आढळून आले आहे.

# भाजपा-शिवसेनेच्या नाटकात काँग्रेसने पडू नये -संजय निरुपम

**मुंबई-** विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून सत्तास्थापनेसाठी व मुख्यमंत्रीपदावरून भाजपा-शिवसेनेत जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत आहे. दोन्ही पक्षांकडून वेगवेगळ्या मार्गांनी दबावतंत्राचा वापर



केला जात आहे. संख्याबळाचेदृष्टीने भाजपाकडे जरी जास्त आमदारांची संख्या असली तरी देखील शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादीच्या मदतीने सत्तास्थापन करून मुख्यमंत्रीपद घेऊ शकते, असे देखील अंदाज वर्तवले जात आहेत. तर काँग्रेसच्या काही नेत्यांकडून शिवसेनेला पाठिंबा देण्याबाबत सकारात्मकता देखील दाखवली जात आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते संजय निरूपम यांनी काँग्रेसला शिवसेनेशी जवळीक न साधण्याच इशारा दिला आहे. भाजपा व शिवसेनेच्या नाटकात काँग्रेसने पडू नये असे त्यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

यावेळी संजय निरूप म्हणाले की, मी माझ्या अनुभवाच्या आधारावर सांगत आहे, शिवसेना कधीच भाजपाच्या सावलीतून बाहेर पडणार नाही. शिवसेना वर्षानुवर्षे अशाचप्रकारे भाजपाशी भांडत आलेली आहे व अखेर जास्त हिस्सा पदरात पाडून घेत ती सत्तेतच बसते. हे पाहता यंदा देखील शिवसेना – भाजपाचेच सरकार येईल.

# मुंबईतील सायबर गुन्हेगारीचा आलेख चढता

**मुंबई-** भूलथापा देऊन बँक ग्राहकांचे तपशील मिळवून परस्पर पैसे हडपणे, विवाहजुळणी संकेतस्थळांवर खोटे तपशील देऊन तरुणींची फसवणूक करणे, ऑनलाइन खरेदी-विक्री गंडा अशा प्रकारांबाबत सरकारी यंत्रणा तसच पोलिसांकडून वारंवार जनजागृती करूनही मुंबईतील सायबर गुन्हेगारीला आळा घालणे शक्य झालेले नाही. शहरात सायबर गुन्हट्यांचा आलेख वाढला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी दुप्पट गुन्हे नोंद होतील, असा अंदाज आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने(एनसीआरबी) २०१७ वर्षांत देशभर घडलेल्या विविध प्रकारच्या गुन्हट्यांचा अहवाल सादर केला. या अहवालानुसार २०१७ मध्ये सर्वाधिक सायबर गुन्हट्यांची नोंद बंगळूरु येथे(२७४३) झाली होती. त्याखालोखाल मुंबईत १३६२ गुन्हे घडले होते. प्रत्यक्षात एनसीआरबीच्या अहवालानुसार दर एक लाख लोकसंख्येमागील गुन्हयंचे प्रमाण पाहिल्यास सायबर गुन्हेगारीत बंगळूरु पहिल्या तर मुंबई पाचव्या क्रमांकावर होते.



एनसीआरबीने देशातील १९ महानगरांमधील गुन्हे, गुन्ह्यांचे प्रमाण आदी तपशील या अहवालात दिले आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत या १९ महानगरांमधील सायबर गुन्हेगारीचे सरासरी प्रमाण ६.४ आहे. मुंबईत हे प्रमाण ७.४ भरते. तर बंगळूरुत ३२.३, जयपूरमध्ये २२.७, लखनऊत २१.० आणि कानपूरमध्ये ७.८ इतके नोंद झाले.

मुंबईचा विचार करता २०१७ मध्ये १३६२ गुन्हे नोंद झाले. २०१८मध्ये गुन्ह्यांची संख्या तेवढीच राहिली. तर या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत १६८६ गुन्हे नोंद झाले. राज्याच्या सायबर विभागानुसार नायजेरियन भामटट्यांकडून आमीष दाखवून फसवणुकीचे, बनावट क्रेडिट-डेबिट कार्ड घोटाळे आटोक्यात असले तरी ऑनलाइन भामटट्यांनी मात्र धुमाकूळ घातला आहे. सायबर विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार नोकरीचे आमीष, ओटीपी मिळवून गंडा आणि विवाहजुळणी संकेतस्थळाद्वारे ओळख वाढवून फसवणूक या प्रकारांमध्ये मोठट्या प्रमाणात वाढ झाली आहे.

## संपादकीय...

# नफा ना उत्पादकांना, ना व्यापाऱ्यांना



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

कांदा हा गेल्या काही दशकांत राजकीय विषय बनला आहे. त्यामुळे मतदारांना तो स्वस्त मिळायलाच हवा, यासाठी आजवरचे सत्ताधारी सतत प्रयत्नशील असतात. परंतु कांदा स्वस्त झाला, तर हेच सत्ताधारी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसायला येत नाहीत. पावसाळा अधिकृतपणे संपल्याचे जाहीर झाल्यानंतरही पडत राहिलेल्या पावसाने नाशिक जिल्ह्यातील कांद्याचे जे प्रचंड नुकसान झाले आहे, ते पाहता येत्या काळात कांदा उत्पादकांची अवस्था अधिक बिकट होणार आहे. सरकार अशा परिस्थितीत कांद्याची आयात करते आणि मतदारांना खूश ठेवते. पण कांदा उत्पादकांसाठी ठोस उपाययोजना मात्र राबवत नाही. यंदा पावसाने कांदा उत्पादनात मोठी घट येणार आहे.



सवंग संवादबाजी करण्याची सवय असलेल्या कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यात थेट बांधांवर जाऊन कांदा उत्पादकांना दोन पैसे अधिक मिळणे कसे महत्त्वाचे आहे, ते मांडले. कांदा परवडत नसेल, तर खाऊ नका. किमान माझ्या शेतकऱ्याला दोन पैसे तरी मिळतील, असा सल्लाही त्यांनी दिला. बाजारात ५०-६० रुपये प्रति किलो कांदा झाला, की लगेच ओरड सुरू होत असल्याने हे कुठे तरी थांबायला हवे. कांदा खायचा असेल तर स्वत: शेत घ्या; तेव्हाच शेतकऱ्यांचे दु:ख कळेल, असा कळवळाही सदाभाऊंनी व्यक्त केला.

कित्येक वर्षांनंतर अलीकडे कांद्याला बऱ्यापैकी भाव मिळाला, तेव्हा केंद्राने शहरी ग्राहकांची नाराजी नको म्हणून कांदा निर्यातबंदीचा निर्णय घेतला. तेव्हाच खरे तर सदाभाऊंनी 'कांदा परवडत नसेल, तर खाऊ नका' अशी सूचना करण्याची गरज होती. परंतु तसे झाले नाही. केंद्र किंवा राज्यात कोणीही सत्ताधारी असो, आजपर्यंत कांद्याचे दर वाढू लागल्यावर निर्यातबंदीसारखे हत्यार उचलले जाते. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात निर्यातबंदी, कांदा साठवणुकीवर आणलेले निर्बंध हे मुद्दे विरोधकांनी लावून धरले होते. त्यातच कांदा आयातीसाठी पाऊल उचलले गेल्याने शेतकऱ्यांच्या नाराजीत भरच पडली होती. त्यामुळे नाशिक येथील सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच कांद्यावरील निर्यातबंदी हटविण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे आश्वासन द्यावे लागले होते.

जी गोष्ट कांद्याची तीच डाळींचीही. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात यंदाच्या खरीप हंगामात उडीद आणि मूग डाळीचा पेरा कमी झाल्याने आणि मध्य प्रदेश, राजस्थानात अतिपावसाने डाळींचे उत्पादन घटल्याने उडीद डाळीचे भाव सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहेत. परतीच्या पावसाचा फटका डाळींनाही बसल्याने आता सगळी मदार रब्बीच्या हंगामावर आहे. सरकारी गोदामांत असलेली डाळ आता विक्रीसाठी बाजारात आणली नाही, तर हे भाव अधिक वाढण्याचीच शक्यता आहे. उडीद, तूर, मूग डाळींचा भारतीय खाद्यान्नातील वापर महत्त्वाचा असतो. कांद्याएवढेच त्यांचेही स्थान महत्त्वाचे मानले जाते. मात्र, प्रत्येक वेळी डाळींच्या भावांकडे दुर्लक्ष करत सरकार मूळ प्रश्नांना बगल देण्याचेच धोरण अवलंबते. अतिपावसामुळे कांद्याचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाल्याने आवक अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने भाव पुन्हा तेजीत आले आहेत. दक्षिणेकडील राज्यांमधून होणारी आवकही पावसामुळे थांबली. त्यामुळे नाशिकच्या कांद्यास मागणी वाढली असली, तरी कांद्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या नाशिक जिल्ह्यातच आता यंदा कांदा दिसेनासा होण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये कांद्याच्या दरात बऱ्यापैकी वाढ होत असल्याचा अनुभव असल्याने शेतकरी उन्हाळ कांद्याची चाळींमध्ये साठवणूक करून ठेवतात. हा साठा आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर असून, त्यातच पावसामुळे त्याचे सडण्याचे प्रमाण वाढले आहे. चाळींमध्ये काही शेतकऱ्यांचा जो थोडाफार कांदा बऱ्यापैकी अवस्थेत आहे, तो चाळींमधून बाहेर काढणे शेतांमध्ये पाणी असल्याने अशक्य झाले आहे. त्यामुळे चाळींमध्येच कांद्याला कोंब फुटले आहेत.

अतिपावसामुळे लागवडीखालील क्षेत्रातील निम्मी पिके उद्ध्वस्त झाल्याचे कृषी विभागाचा प्राथमिक अंदाज सांगतो. जिल्ह्यात उशिराने येणाऱ्या खरीप कांद्याचे ५० हजार हेक्टर क्षेत्रापैकी जवळपास निम्मे नुकसान झाले आहे. त्यामुळे लासलगाव बाजार समितीत कांद्याची आवक कमालीची घटल्याने भाव १५ दिवसांत दुप्पट झाले आहेत.

# दोहोंतील विश्वासार्हता रसातळाला

**आपला मान राखला जावा अशी इच्छा असणाऱ्याने इतरांचाही मान ठेवावा लागतो आणि ताठ मानेने जगायचे तर आपला हात कोणत्याही दगडाखाली नाही याचा आत्मविश्वास असावा लागतो, हे जितके खरे तितकेच हेही खरे की, अपमान करणारे राजकारण करण्यात काही शहाणपण नाही..**

चारचौघांत कचाकचा भांडताना एकमेकांचा जाहीर उद्धार झाल्यानंतर गळ्यात गळे घालून नसलेल्या प्रेमाचे प्रदर्शन करणाऱ्या आणि इतका वेळ भांडणाची मजा घेतली म्हणून इतरांवरच डाफरणाऱ्या हास्यास्पद जोडप्यासारखी भाजप-शिवसेना युतीची अवस्था आहे. सुखाने नांदण्याइतका समजूतदारपणा नाही आणि काडीमोडाची धमक नाही. संसार झेपत नाही आणि ते सांगताही येत नाही, असा हा प्रकार. खरे तर हे असे होऊ शकते हे मान्य. पण आपण एकत्र नांदतो म्हणजे जणू महाराष्ट्रावरच उपकार करतो असा या दोघांचा जो आव असतो, तो मात्र तिडीक आणणारा आहे. एरवी कोणत्याही दोघांच्या भांडणात तिसऱ्याने नाक खुपसायचे कारण नाही. पण येथे प्रश्न राज्याचा असल्याने या दोघांत जे काही सुरू आहे त्याचा समाचार घेणे आवश्यक ठरते.

तो घेताना या दोहोंतील विश्वासार्हता रसातळास गेल्याचे सत्य मान्य करावे लागेल आणि तशी ती जाण्यात सध्या मोठा भाऊ म्हणून मिरवणाऱ्या भाजपचा वाटा मोठा आहे, हेदेखील मान्य करावे लागेल. याचे कारण भाजपकडून आपल्या सहयोगी पक्षांस दिली जाणारी वागणूक. ती आदराची नाही. बिहारात नितीशकुमार यांच्यासारख्या नव्या जोडीदारासमोर नांगी टाकणाऱ्या वा एके काळी चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसमच्या नाकदुऱ्या काढणाऱ्या भाजपने सातत्याने शिवसेना या आपल्या जुन्या भागीदारास नेहमीच हडतहुडुत केले. यामागे आज ना उद्या आपण स्वबळावर येऊ शकतो, सबब या जोडीदाराची गरज नाही हे कारण. भाजपचे आपल्या सहयोगी पक्षांशी वागणे हे संशयातीत नाही, हा इतिहास आहे. भाजपची साथ ही अजगराच्या मिठीसारखी असते. सुरुवातीस या मिठीची जाणीव होत नाही. होते तेव्हा ही मिठी बरगड्या मोडण्याइतकी ताकदवान झालेली असते. तेव्हा तीमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न हा अजगरापेक्षा ज्याला मिठी मारली त्यासाठीच जीवघेणा ठरतो.

शिवसेनेस आता याची जाणीव होत असणार. पण त्यास शिवसेना स्वत:च जबाबदार धरावी लागेल. मराठीच्या मुद्द्यावर बदफैलीपणा केल्यानंतर त्या पक्षाने स्वत:स हिंदुत्वाच्या रथात कोंबले. त्या रथाचे सारथ्य भाजपकडे असल्याने



तेथे सहप्रवासी होण्याखेरीज सेनेस पर्याय नव्हता. आणि अजूनही नाही. स्थानभ्रष्ट होणे हे ज्याप्रमाणे इभ्रतीची माती करणारे असते, त्याप्रमाणे असे मुद्देभ्रष्ट होणे हे राजकीय पक्षांसाठी विनाशकारी असते. तेव्हा भाजपकडून सेनेस दिल्या जाणाऱ्या दुय्यम वागणुकीस खुद्द सेना नेते जबाबदार आहेत यात शंका नाही. आज भाजपकडून कोणी तरी हलकीसलकी व्यक्ती चर्चेसाठी 'मातोश्री'वर पाठवली जाते म्हणून नाराजी व्यक्त करणाऱ्या सेना नेत्यांस स्वत:च्या वर्तनाची जाणीव करून द्यायला हवी. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आदी नेत्यांना आपण एके काळी कशी वागणूक दिली, हे एकदा सेना नेत्यांनी आठवून पाहावे. आपला मान राखला जावा अशी इच्छा असणाऱ्याने इतरांचाही मान ठेवावा लागतो, हे साधे तत्त्व सेना नेते विसरले. दुसरे असे की, ताठ मानेने जगायचे असेल तर आपला हात कोणत्याही दगडाखाली नाही, याचा आत्मविश्वास असावा लागतो. परंतु येथे सेनेचा हातच काय, पण संपूर्ण देहच मुंबई महापालिकेच्या भल्याथोरल्या 'खड्ड्यात' रुतलेला. हे सत्य शिवसेनेस पचवावे लागेल. असे सत्य जेव्हा पचवावे लागते, त्या वेळेस अपमानही गिळावा लागतो. त्यामुळे भाजपकडून मान मिळत नाही, याची तक्रार करण्यात अर्थ नाही.

त्याच वेळी हेही खरे की, असे अपमान करणारे राजकारण करण्यात काही शहाणपण नाही. राजकारण ही माणसे जोडण्याची कला आहे. स्वत:च्या मिजासीवर राज्य एखादे वेळेस वा दुसऱ्यांदाही मिळेल. पण ते केवळ स्वत:च्याच जिवावर राखता येईलच असे नाही. 'आपणास कोणाची गरज नाही,' असा फुकाचा अभिमान बाळगणारे वैयक्तिक आयुष्यातही अखेर एकटे पडतात आणि त्या वेळेस कोणी ढुंकूनही पाहावयास येत नाही. राजकारणासही हे लागू पडते. 'राखावी बहुतांची अंतरे' हे यशस्वी समाजकारणाचे सूत्र. खोट्या आत्मगौरवासाठी त्यास तिलांजली देण्याचे कारण नाही. भाजपकडून सध्या ती दिली जाते, हे सत्य. जम्मू-काश्मिरातील मेहबूबा मुफ्ती यांचा पीडीपी ते आंध्रातील तेलुगू देसम, तमिळनाडूतील अण्णा द्रमुक व्हाया महाराष्ट्रातील शिवसेना हा भाजपचा प्रवास हा सहयोगी पक्षांच्या अपमानाचा इतिहास आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात तर याची अजिबात गरज नाही. आणि नव्हती. हे भान सुटल्याने या निवडणुकीत भाजपने अनेक सेना उमेदवारांच्या पराभवासाठी जंग जंग पछाडले. सेनेची जिरवण्याच्या उद्देशाने कोकणात गोव्याच्या मुख्यमंत्र्यांना पाठवून, नामांकित राणे पितापुत्रांना घेऊन वा अलिबाग/उरण परिसरांत बंडखोरांना रसद देऊन भाजपने सेनेची कोंडी करण्याचे अनेक प्रयत्न केले. बरे या सगळ्यात भाजप तत्त्ववादी राहिला असता तरी त्याचे स्वागत करता आले असते. त्याबाबत सेनेप्रमाणेच भाजपची स्थिती. निवडणुकांच्या तोंडावर घाऊक पक्षांतरितांना भाजप आपले म्हणत गेला. शिवसेना ते राष्ट्रवादी आणि भाजप तूर्त असा प्रवास करणाऱ्या राहुल नार्वेकर यांच्याप्रमाणे अनेक 'उडत्या तबकड्यां'ना भाजपने उमेदवारी दिली; त्यामागे कोणता उदात्त तत्त्वविचार असणार? तेव्हा उगा नैतिक टेंभा मिरवावा अशी भाजपची स्थिती नाही. बऱ्याचदा मद्यपींपेक्षा निर्व्यसनींची कथित नैतिकता अधिक डोके उठवते. भाजपचे हे असे झाले आहे आणि त्यात तो निर्व्यसनीही राहिलेला नाही. म्हणजे अधिक धोकादायक.

# जिल्ह्यात सर्वत्र भातशेती नुकसान पंचनामे सुरू

**पारोळ-** वसई तालुक्यात परतीच्या पावसाने झालेल्या भातशेती नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली असून सहा. कृषी अधिकारी शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करताना दिसत आहेत. तालुक्यात साधारणपणे ६० ते ७५ टक्के भातशेतीचे



नुकसान झाल्याचा अंदाज त्यांच्याकडून वर्तवण्यात येत आहे. यंदा वसई तालुक्यात साधारण पाच महिने पाऊस पडला असून आजही आभाळ भरलेच आहे. हंगामात ऐन कापणीच्या वेळेलाही पाऊस सुरूच राहिला. त्यामुळे लांबलेल्या कापण्यांमुळे शेतातील तयार पिकाच्या वजनदार कणसांवर पडणारे पाणी कणसांना अधिक वजनदार बनवत असल्याने उभी पिके आडवी पडली. यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून येथील बळीराजा हवालदिल झाला आहे. पावसामुळे भात पिकांचे झालेले नुकसान हे भाताला पुन्हा कोंब फुटल्याने, चिखलात दाणे नष्ट झाल्याने, तसेच पाण्यात जास्त वेळ राहून कुजल्याने झाले आहे. यामध्ये अनेक शेतकऱ्यांनी पीक हाती लागावे म्हणून शेतात ओले सुकलेले ज्या परिस्थितीत पीक आहे त्या परिस्थितीत त्याची कापणी करून अंगणात, ओट्यावर, घरात आणले, मात्र रचलेल्या उडव्यांमधील ओलाव्यामुळे भाताच्या भाऱ्यांत प्रचंड उष्णता निर्माण झाली आणि दाणे वाफल्यानेही नुकसान झाले आहे. भात नुकसानी बरोबरच झोडणीनंतर मजुरी खर्चाला हातभार लावणारे भात पिकाची पावली काळी पडल्याने त्याला ग्राहक नाही.

# मच्छीमारांची अर्थव्यवस्था कोलमडली

**बोर्डी–** हवामानातील बदलामुळे समुद्र खवळलेला राहून जोराचे वारे वाहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त करून ७ नोव्हेंबरपर्यंत मच्छीमारांनी समुद्रात न जाण्याची सूचना केली आहे. दरम्यान, हंगामाला प्रारंभ होऊन निम्म्यापेक्षा कमी दिवस मासेमारी झाल्याने या व्यवसायाला आर्थिक झळ पोहोचली असून मंदीचा सामना करावा लागत असल्याचे वास्तव कोळीबांधवांनी मांडले.

डहाणू तालुका हा बोंबिल, शिवंड, पापलेट, घोळ, दाढा अशा दर्जेदार मासेमारीसाठी ओळखला जातो. ऑगस्ट मध्यापासून येथे मासेमारी हंगामाला प्रारंभ झाल्यापासून सुमारे ७५ दिवसांचा मासेमारीचा कालावधी उलटला आहे. परंतु मोठे उधाण, अतिवृष्टी, विविध सण आणि २३ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबरपर्यंत दोन चक्रीवादळांमुळे मासेमारी ठप्प असणार आहे. डहाणू तालुक्यात वरोर मासेमारी गावात ३०, धाकटी डहाणू १९०, डहाणू ७४, आगर ३१, चिखले ११, घोलवड ३ आणि सीमेलगतचे झाई बंदरात ११४ अशा सुमारे ४५८ मासेमारी बोटी आहेत. त्यांना सुरक्षेच्या दृष्टीने समुद्रात न जाण्याच्या सूचना मत्स्य व्यवसाय विभाग, बंदर विभाग, तटरक्षक दल, सागरी पोलीस यांच्याकडून देण्यात आल्या आहेत. तर काही बोटी समुद्रातून माघारी बोलवण्यात आल्या आहेत. आता ७ नोव्हेंबर पर्यंत दक्षतेचा



कालावधी असल्याने मच्छीमार अस्वस्थ झाला आहे. कर्ज घेऊन व्यवसायात गुंतवणूक केली, मात्र मासेमारीची पुरेशी संधी उपलब्ध न झाल्याने घरात जीवनावश्यक वस्तू खरेदी करायला पैसा नाही. कुटुंबाने दिवाळीही साजरी केली नाही. एका बोटीवर प्रतिदिन पाचशे रु पये प्रमाणे आठ महिन्यांसाठी चार ते पाच खलाशांना करारबद्ध केले आहे. त्यांच्या दोन्ही वेळचा नाश्ता आणि जेवणाचा आर्थिक भार व्यावसायिक उचलतो. शिवाय इंधन, बर्फ, बोटीची डागडुजी आणि अन्य खर्च वेगळाच. आज बाजारात मासे खरेदीदार आहेत, मात्र विक्रीसाठी मासेच नसल्याने होणारी घालमेल वेदनादायक असल्याचे झाई मच्छी बाजारातील कोळिणी सांगतात. उर्वरित सहा महिन्यांच्या कालावधीत होणाऱ्या मासेमारीतून घसारा, कर्ज फेड, आणि पैसे उपलब्ध होतील का? या चिंतेने व्यवसायिकांना ग्रासले आहे.

बंदर विभागाचे कामच काय? वांद्रे, डहाणू अशा दोन कार्यालयांची जबाबदारी

च्समुद्रात वादळी हवामान असल्याची सूचना देणारा ३ नंबरचा बावटा डहाणू फोर्ट येथील विभागाच्या कार्यालयानजीक शनिवारी लावला. खोल समुद्रात मासेमारी करणे धोकादायक असल्याच्या सूचना मिळाल्यानंतर मासेमारी बोटी डहाणू बंदरात आल्या.

# मच्छिमारांनी समुद्रात जावू नये पर्यटकांनी समुद्र किनारी जाणे टाळावे

## आपतकालीन यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना



**अरबी समुद्रात महा नावाचे चक्रीवादळ निर्माण झाले असून हे चक्रीवादळ ६ नोव्हेंबर ते ८ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत धडकणार आहे. या वादळाचा फटका ठाणे जिल्ह्याला बसण्याची बसणाशक्यता असल्याने जिल्ह्यातील आपतकालीन यंत्रणांनी सज्ज राहावे अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर दिल्या.**

सोमवारी समिती सभागृहात प्रशासकीय यंत्रणेच्या पूर्व तयारीचा आढावा घेवून आपतकालीन परिस्थिती सामना करणाऱ्या सर्व संबधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी ठाणे जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनवणे, निवासी जिल्हाधिकारी डॉ. शिवाजी पाटील उपस्थित होते.

**मच्छिमारांनी समुद्रात जावू नये**

जिल्ह्यातील मच्छिमारांनी पुढील तीन दिवस (दि. ८ नोव्हेंबर पर्यंत) मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, जे मच्छिमार समुद्रात गेले आहेत त्यांनी तातडीने परत यावे. परतताना जवळच्या बंदरांवर आसरा घ्यावा, असे आवाहन श्री. नार्वेकर यांनी केले.

**समुद्रकिनारी पर्यटकांनी जाणे टाळावे**

तसेच सुट्टीचा कालावधी असल्याने समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या वादळाचा संभाव्य धोका लक्षात घेवून पर्यटकांनी समुद्र किनारी जाणे टाळावे असे आवाहन त्यांनी केले. नैसर्गिक आपत्तीत मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तुकड्या मुंबई, पुणे येथे तैनात असून आवश्यकता भासल्यास त्यांची मदत घेतली जाईल असेही ते म्हणाले.

**कर्मचार्यांनी मुख्यालय सोडू नये: रजेवर असणाऱ्यांनी हजर व्हा**

पालिका, महसूल, आरोग्य, वैदकीय पथक, आपत्तीव्यवस्थापन आणि इतर सर्व यंत्रणाच्या अधिकारी-कर्मचारी वर्गाने मुख्यालयात राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच रजेवर असणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्या रजा रद्द करून हजर होण्याचे सूचना दिल्या चक्रीवादळामुळे पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून समुद्र किनाऱ्यालगतच्या गावांना अधिक सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पत्र्याची कच्ची घर, झोपड्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पक्क्या घरामध्ये स्थलांतर करणे, शेतकऱ्यांनी काढून ठेवलेली पिकं आणि बाजार समितीत आलेल्या अन्नधान्याची नासाडी होऊ नये यासाठी उपयोजना करण्याच्या करण्याच्या सूचना निवासी उप जिल्हाधिकारी डॉ. शिवाजी पाटील यांनी दिल्या . या बैठकीला विविध महानगर पालिकेचे अधिकारी, आरोग्य, कृषि, पशुसंवर्धन, पोलीस आणि इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# 'क्यार', 'महा' चक्रीवादळाचा फटका पर्यटनाला; भूकंपाच्या धक्क्यांचाही होतोय परिणाम

**पालघर-** 'क्यार' चक्रीवादळानंतर पुन्हा नव्याने निर्माण झालेल्या 'महा' चक्रीवादळासोबतच जिल्ह्यात एकावर एक बसत असलेल्या भूकंपाच्या धक्क्याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर बसत असून यंदा केवळ १५ टक्के पर्यटकांनी केळवे तसेच इतर पर्यटन स्थळांना भेटी दिल्याने या व्यवसायाचे आर्थिक कंबरडेच मोडले आहे. पर्यटकांच्या मनात वाढत चाललेली ही भीती भविष्यात पर्यटन व्यवसायाला मारक ठरू शकते. जिल्ह्याला ११० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून रेल्वेची साखळी, चांगले रस्ते अशी उत्कृष्ट वाहतूक व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय, उत्तम पर्यटन स्थळे आणि प्रदूषणविरहीत समुद्र किनारे असल्याने दरवर्षी पालघर जिल्ह्यातील झाई, बोर्डी, डहाणू, केळवे, जव्हार, अर्नाळा आदी भागात मुंबई, गुजरात राज्यातील हजारो पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. जिल्हा प्रशासन पातळीवरूनही येथे येणाऱ्या पर्यटकांना उत्तम सोयीसुविधा पुरविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत.

नवरात्रोत्सव संपला की कॉर्पोरेट कंपन्यांचे ग्रुप, महिला मंडळे, पुरूष ग्रुप यांची पावले जिल्ह्यातील पर्यटन स्थळाकडे



वळतात. तर दिवाळी संपली की आपल्या मुलाबाळांसह शेकडो कुटुंबे केळवे, अर्नाळा, कळंब, डहाणू-बोर्डी आदी भागाला भेट देत असतात.

अरबी समुद्रांतर्गत अचानक झालेल्या बदलांचा मोठा फटका या वर्षीच्या पर्यटन हंगामास बसला आहे. क्यार चक्रीवादळानंतर महा चक्रीवादळ सक्रिय झाल्याने त्याचा परिणाम किनारपट्टी भागात जाणवू लागला आहे. शुक्र वारी सकाळपासूनच समुद्री वातावरणात बदल झाल्याचे दिसून आले. यात लाटांचा वेगही वाढला असून किनाड्ड्यावर लाटांचा तडाखा बसत आहे. समुद्र खवळल्याने पाण्याच्या पातळीत वाढ होत समुद्राचे पाणी गावातील घरात शिरू लागले आहे.

तर डहाणू तालुक्यात ११ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या भूकंपाच्या धक्क्याने पंचविशी गाठली असून मागच्या आठवड्यापर्यंत हे धक्के सुरूच आहेत. ४.८ रिष्टर स्केलपर्यंत या भूकंपाने मजल गाठल्याने याचा धसका पर्यटकांच्या मनात घर करून बसला आहे. त्यामुळे एके ठिकाणी कधीही बसणारे भूकंपाचे धक्के, अवेळी कोसळणारा पाऊस, तर दुसरीकडे क्यार आणि महा चक्रीवादळाच्या तडाख्याची भीती पर्यटकांना सतावत आहे. मुंबई, नाशिक, वापी, सुरत आदी भागातील पर्यटक अशा धोकादायक बनू पाहणाड्ड्या वातावरणाची चौकशी करून येण्याचे टाळत असल्याचे केळवे बीच पर्यटन महोत्सवाचे अध्यक्ष आशिष पाटील यांनी 'लोकमत'ला सांगितले. पर्यटकांच्या मनातील भीती दूर सारीत त्यांना विश्वास वाटेल, यासाठी सोयीसुविधा उभारायला हव्यात, अशी मागणी होत आहे.

जिल्ह्यात हळुहळू कमी होत चाललेला पर्यटन व्यवसाय टिकून रहात पर्यटकांनी अधिकाधिक या भागातील पर्यटन स्थळांना भेटी द्याव्यात म्हणून केळवे येथे केळवे बीच पर्यटन महोत्सवाचे आयोजन ९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. ताजे पापलेट, कोळंबी, सुरमई, बोंबील, उकड हंडी आदी खाद्य पदार्थांची चांगली व्यवस्था ठेवण्यात आल्याचे कार्यवाह संजय घरत यांनी सांगितले.

# शिवसेनेचा मुख्यमंत्री शिवतीर्थावर शपथ घेणार -संजय राऊत



**मुंबई : शिवसेनेसाठी शिवतीर्थ हे पवित्र असून, त्याठिकाणीच राज्याचा पुढचा मुख्यमंत्री म्हणून शिवसैनिक जनतेसमोर मुख्यमंत्रीपदाची शपथ घेईल. शिवसेना कधीही झुकणार नाही. शिवसेना स्वाभिमानाने त्यांचा हक्क घेईल, असे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सांगितले. राज्यातील जनतेला हेच पाहिजे आहे, शिवसेनेचा मुख्यमंत्री हवा आहे. खोटं बोलणाऱ्यांना घरी बसवा असे सांगत संजय राऊत यांनी युतीतील मित्रपक्ष भाजपला इशाराच दिला आहे. आता चर्चा मुख्यमंत्री पदावरच होईल, असे सांगत युतीतील चर्चा अद्याप पुढे झाली नसल्याचे राऊत यांनी सांगितले. महाराष्ट्र मनान आणि विचाराने मुक्त झाला आहे.**

संजय राऊत म्हणाले, की सरकारी यंत्रणांचा वापर केला जात आहे. याचा गौप्यस्फोट लवकरच आम्ही करू. ऑपरेशन कमळ महाराष्ट्रात चालणार नाही. २१ तारखेला मतदार संपल्यानंतर अफवांचे कारखाने संपुष्टात आले आहेत. अफवांचा कारखाना कुठे हे माहिती आहे. मुख्यमंत्र्यांता शपथविधी कुठे होणार हे माहिती नाही. कुठलही मैदान बुक करा आम्हाला फरक पडत नाही. राजकीयदृष्ट्या सामनातून भाष्य केले आहे. भाजपकडून तो मी नव्हेच अशी भूमिका घेतल्याने उद्धव ठाकरे यांनी चर्चा थांबविली आहे. अंतिम निर्णयापर्यंत उद्धव ठाकरे आले आहेत. गणितं जुळली की ते माध्यमांसमोर येतील. शरद पवार हे देशाचे मोठे नेते आहेत. कर्नाटकात ऑपरेशन कमळ समोर आले आहे. अशा गोष्टी महाराष्ट्रात चालणार नाही. राज्यात खोटारडेपणा चालणार नाही. जनता त्यांना धडा शिकवेल. हरियानाचा तिढा सोडविण्यासाठी अमित शहांना पुढाकार घेतला. पण, महाराष्ट्रात त्यांनी पुढाकार न घेणे हे रहस्यमय आहे. अमित शहांनी महाराष्ट्रात जास्त लक्ष दिले नाही, हे सत्य आहे. शिवसेना बाजारात बसलेली नाही, कोणतेही फॉर्म्युला स्वीकारण्यासाठी. आम्ही पाहिजे तेव्हा शरद पवार यांचे मार्गदर्शन घेऊ.

**शिवसेनेला १७५ आमदारांचा पाठिंबा'**

भाजपने मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधी महालक्ष्मी रेसकोर्स आणि वानखेडे मैदान बुक केल्याची चर्चा आहे. याची कागदपत्रेही आमच्याकडे आहेत. मात्र, शिवसेनेचा मुख्यमंत्री हा शिवतीर्थावरच शपथ घेईल, असे संजय राऊत यांनी ठणकावून सांगितले. ते रविवारी मुंबईतील पत्रकारपरिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी शिवसेना काहीतरी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे सुतोवाचही केले. उद्धव ठाकरे यांच्यासमोर अनेक पर्याय खुले होते, त्यांनी नुकतीच एका पर्यायावरची चर्चा संपवली आहे. त्यांचा निर्णयही जवळपास अंतिम झाला आहे. शिवसेनेकडे सध्याच्या घडीला १७० पेक्षा जास्त आमदारांचे संख्याबळ आहे, असा दावा यावेळी राऊत यांनी केला. या पत्रकारपरिषदेत राऊत यांनी भाजपला युतीच्या जुन्या दिवसांची आठवणही करून दिली. बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे आणि प्रमोद महाजन यांच्यात चांगला संवाद होता. तेव्हा बाळासाहेब भाजपला अनेक गोष्टी उदारपणे द्यायचे, असे राऊत यांनी सांगितले.

# ज्याचे नुकसान झाले त्याला मदत मिळणारच

**अकोला-** ज्या शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे, त्यांना मदत मिळालीच पाहिजे. सरकारी पंचनाम्यावर मदत केली जाईल. शासकीय यंत्रणांची जबाबदारी आहे, त्यांनी सर्वांपर्यंत मदत पोचविली पाहिजे. दुष्काळात देणाऱ्या सर्व मदती हा ओला दुष्काळ समजून करण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अकोला जिल्ह्यावर असलेल्या मुख्यमंत्री फडणवीस सोयाबीन, ज्वारी, कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारकडून १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. नुकसानीचा पंचनामा झाला नसला तरी चालेल, तुम्ही फक्त फोटो पाठविला तर त्याला मदत देण्यात येईल. जास्तीत जास्त दिलासा काम करू. ६ नोव्हेंबरपर्यंत १०० टक्के पंचनामे पूर्ण करणार आहे. मदतीपासून कुणीही वंचित



यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेतली. फडणवीसांनी म्हैसपूर, चिखलगावला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत अकोल्याचे खासदार संजय धोत्रे उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, की ओला दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे दुष्काळाच्या काळात जी मदत शेतकऱ्यांना करतो, ती मदत आपल्याला शेतकऱ्यांना करायची आहे. मदतीबाबतचे जीआर लवकरच काढण्यात येतील. बांधावर जाऊन शेतकऱ्यांची पाहणी केली. विम्याचा वापर शेतकऱ्यांनी केलेला दिसत आहे. राहणार नाही. पिकांची अवस्था खूप वाईट आहे. शासकीय यंत्रणा सक्षम असली पाहिजे. यंत्रणेची जबाबदारी म्हणून काम करा. सरकारी पंचनाम्यावर मदत करण्यात येईल. पिकवीम्याच्या पावतीवरही शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल. पावती नसली तरी पैसे देण्यात येतील. शेतकऱ्याला पुन्हा उभे करण्यासाठी काम करण्यात येत आहे. मदतीसाठी सोपी पद्धत अवलंबिण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात हेल्पलाईनद्वारे मदत पोचविण्यात येईल. मदतीचा ओघ सरकारकडून आजपर्यंतचा सर्वांत जास्त असेल.

# १० दिवसांत ४ ऐतिहासिक निकाल देणार सुप्रीम कोर्ट

**मुंबई -** येत्या दहा दिवसांत सर्वोच्च न्यायालय चार अत्यंत महत्त्वाच्या खटल्यांचा निकाल देणार असून, या निकालांचे देशावर दूरगामी परिणाम संभवतात. या चार खटल्यांमध्ये अर्थात एक खटला आहे तो अयोध्येचा.

विशेष म्हणजे सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतत्वाखालील खंडपीठांकडूनच हे चारही निकाल देण्यात येणार आहेत. त्यात अयोध्या खटल्याकडे देशाचेच नव्हे तर जगाचे लक्ष आहे. अयोध्येचा निकाल एकमताने देऊ शकेल का, असाही प्रश्न आहे. निकाल एकमताने आल्यास कोणताही संभ्रम मागे राहणार नाही, मात्र चार विरुद्ध एक, किंवा तीन विरुद्ध दोन असा हा निकाल आल्यास विरोधी निकाल नोंदवणाऱ्या न्यायाधीशांनी काय म्हटले आहे याचीही चर्चा अधिक होईल, अशी भीती व्यक्त केली जातेय.

२ केरळच्या जगप्रसिद्ध सबरीमला अयप्पा मंदिरात महिलांना प्रवेश देण्याचा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निकालाविरुद्ध दाखल झालेल्या



सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रांत मोठी उलथापालथ घडवू शकतो.

१ अयोध्येचा खटला १८५८ पासून सुरूच आहे. या प्रश्नाने देशाच्या राजकारणात आधीच मोठी उलथापालथ घडवली आहे. हा निकाल प्रभू रामचंद्राच्या बाजूने लागतो की आक्रमक बाबराने बांधलेल्या मशिदीच्या बाजूने याबद्दल जगभर उत्सुकता आहे. सरन्यायाधीशांसह पाच न्यायाधीशांचे खंडपीठ अयोध्येचा निकाल देईल. हिंदू-मुस्लिम दुफळी निर्माण करणाऱ्या या प्रकरणाचा निकाल हे खंडपीठ पुनर्विचार याचिकांवरही पुन्हा सर्वोच्च न्यायालय आपला निकाल देणार आहे.

३ गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने राफेल लढाऊ विमानांचा मुद्दा प्रचारात वापरला. या विमानांच्या खरेदीत घोटाळा झाल्याचा आरोप करीत काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष राहुल गांधी यांनी रान उठवले होते. म

४ सरन्यायाधीशांचे पद माहिती हक्काच्या कक्षेत आणावे का, असा प्रश्न उपस्थित झाला आणि आता त्याचेही उत्तर सर्वोच्च न्यायालयालाच द्यायचे आहे.

# औरंगाबाद फुलंब्री येथे दोन लाखांचा गुटखा जप्त

**फुलंब्री-** पाल येथे छापा मारून पोलिसांनी दोन लाखांचा गुटखा जप्त केला असून, याप्रकरणी आरोपी संतोष जाधव याला मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. औरंगाबाद ग्रामीण उपविभागीय विभागास पाल येथून मोठ्या प्रमाणात गुटखा तस्करी होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार या विभागाने फुलंब्री पोलिसांच्या मदतीने शनिवारी दुपारी चारच्या दरम्यान पाल येथे जावून छापा टाकला. यात संतोष तेजराव जाधव यांच्या घरात हा मुद्देमाल सापडला. यामध्ये हिरा, विमल, गोवा, राजनिवास अशा वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा मोठ्या प्रमाणात आढळून आला. हा मुद्देमाल जवळपास दोन लाखांचा आहे. आरोपी संतोष जाधव यास ताब्यात घेऊन सर्व माल जप्त करण्यात आला. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली फुलंब्री पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक वाघमारे, पोलिस अनिल जायभाये, रामेश्वर चेळेकर,



जाधव यांनी ही कारवाई केली. रात्री उशिरापर्यंत याबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# राम मंदिराबाबतचा निर्णय मोठ्या मनाने स्वीकारा- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

**नागपूर-** राम जन्मभूमी आणि बाबरी मशीद जमीन वाद प्रकरणी सर्वोच्च न्यायालय लवकरच अंतिम निर्णय देणार आहे. यासंदर्भात जो काही निर्णय येईल तो जनतेने मोठ्या मनाने स्वीकारावा व शांतता बाळगावी, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने बुधवारी ट्विटरद्वारे केले. सर्वोच्च न्यायालयाने रामजन्मभूमी-बाबरी मशीद जमीन वाद प्रकरणाची सुनावणी नुकतीच संपवली. सरन्यायाधीश रंजन गोगोई येत्या १७ नोव्हेंबरला निवृत्त होणार असल्याने त्याआधी या प्रकरणाचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने समाजमाध्यमाद्वारे राम मंदिर प्रकरणी न्यायालयाचा निर्णय काहीही आला तरी जनतेने त्याचा स्वीकार करावा, निर्णयानंतर देशात सौहार्दपूर्ण वातावरण ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे आवाहन केले.



यासंदर्भात संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख अरुण कुमार यांनी पत्रक काढलेआहे.


# राज्यात ज्येष्ठ नागरिक असुरक्षित

**मुंबई -** घरातील ज्येष्ठ नागरिकांना आदराने वागवण्याची संस्कृती असलेल्या महाराष्ट्रात सर्वाधिक गुन्हे ज्येष्ठ नागरिकांविरोधात घडत असल्याचे समोर आले आहे. देशातील ज्येष्ठ नागरिकांविरोधात सर्वाधिक म्हणजे पाच हजार ३२१ गुन्हे महाराष्ट्रात घडले आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) २०१७ च्या गुन्हे आकडेवारीतून ही बाब स्पष्ट झाली आहे. २०१६ च्या तुलनेत त्यात वाढ झाली आहे. राज्याची राजधानीही त्याला अपवाद नसून देशातील प्रमुख महानगरांमध्ये मुंबईत ज्येष्ठांविरोधातील सर्वाधिक म्हणजे एक हजार ११५ गुन्हे दाखल झाले आहेत. ज्येष्ठ नागरिकांबाबत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. २०१५ मध्ये राज्यात चार हजार ५६१, २०१६ मध्ये ६९४; तर २०१७ मध्ये पाच हजार ३२१ गुन्हे दाखल झाले आहेत. २०१७ मध्ये राज्यात १५२ ज्येष्ठ नागरिकांच्या हत्या महाराष्ट्रात घडल्या. हत्यांबाबत



तामिळनाडूपाठोपाठ राज्याचा क्रमांक लागतो. याशिवाय ६६ गुन्हे हत्येचा प्रयत्न, २४६ गंभीर मारहाणीचे, ३५५ जबरी चोरीचे व १०१५ फसवणुकीचे गुन्हे वरिष्ठ नागरिकांबाबत घडले. सर्वांत लाजिरवाणी गोष्ट म्हणजे राज्यात २०१७ मध्ये नऊ ज्येष्ठ नागरिक महिलांवर बलात्कार झाला आहे. केरळमध्ये सर्वाधिक १९ ज्येष्ठ नागरिक महिलांवर बलात्कार झाले आहेत. मुंबईही वरिष्ठ नागरिकांविरोधातील गुन्ह्यांमध्ये देशात आघाडीवर आहे. मुंबईत २०१७ मध्ये एक हजार ११५ गुन्हे घडले आहेत. २०१६ मध्ये १२१८ गुन्हे घडले होते; तर २०१४ मध्ये ९४४ व २०१५ मध्ये ११२१ गुन्हे ज्येष्ठ नागरिकांविरोधात घडले होते. उतारवयात ज्येष्ठ नागरिकांना दररोजच्या कामासाठी नोकर व इतर व्यक्तींवर अवलंबून राहावे लागते.

# मुंबईला ४४० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी



**मुंबई-** मुंबईकरांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी पालिकेने हाती घेतलेल्या नव्या तीन धरण प्रकल्पांपैकी गारगाई धरणासाठी खासगी जमीन ताब्यात घेण्यासाठी सुधार समितीने १४८ कोटी रुपये खर्चाला शनिवारी मंजुरी दिली. त्यामुळे धरणाच्या कामासाठी पालिकेचे पाऊल पुढे पडले आहे. मुंबईला दररोज ३९५८ दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा केला जातो. गारगाई धरण पूर्ण झाल्यानंतर त्यातून मुंबईला दररोज ४४० दशलक्ष लिटर इतके अतिरिक्त पाणी मिळणार आहे. वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या डॉ. एम. ए. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीच्या शिफारशींनुसार मुंबई महानगरपालिकेने मध्य वैतरणा प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर गारगाई प्रकल्प प्राध्यान्याने विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे.

# महिलांच्या तुलनेत महाराष्ट्रात पुरूषांच्याच आत्महत्या जास्त

**बुलढाणा-** पारंपारिक पुरूष प्रधान मानसिकतेमुळे पुरूषांना मोकळेपणाने त्यांच्या भावना व्यक्त करता येत नाहीत. पुरुषांना सांगितले जाते की, त्यांना कठोर असणे आवश्यक आहे आणि त्यांनी कुठल्याही अडचणीत मदतीसाठी विचारणा करण्याची गरज नाही. या पारंपारिक कठोर नियमांमुळे पुरूषांना दुसऱ्यांकडे जाऊन गरजेच्या वेळी मदत मागणे अवघड होऊन बसते. पुरूषांमधील नैराश्याचे निदान होण्याच्या घटना सामोऱ्या येत नाहीत, कारण ते डॉक्टरांकडे जाऊन त्यांच्या नैराश्याच्या भावना बोलून दाखवण्यास तयार नसतात. कारण, हा पुरूष हा नेहमी कणखरच असला पाहिजे ही पारंपारिक भूमिका त्यात नेहमी आड येत असते. पुरूषांमधील नैराश्याची भावना ही कामाच्या ठिकाणचे प्रश्न व घरातील नातेसंबंध यांच्याशी निगडीत असते, परंतु असे असले तरी पुरूष त्यांच्या भावनांचे वर्णन हे दुःख किंवा निराशा या पद्धतीने न करता आपल्याला ताण आला आहे असे सांगून वेळ मारून नेतात. त्यात नैराश्याच्या भावनेचा स्पष्ट उल्लेख ते करत नाहीत.

एनएचपी (नॅशनल हेल्थ प्रोफाइल)च्या अहवलानुसार सन २०१७ मध्ये ३० ते ४५ वयोगटातील मध्यम वयोगटातील पुरूषांच्या झालेल्या आत्महत्येचा चिंताजनक आकडा ४४ हजार ५९३ होता. एकूण १ लाख ३३ हजार नागरिकांचा आत्महत्येमुळे मृत्यू झाला आहे. एनएचपीच्या २०१९ मधील अहवलानुसार २०१५ मध्ये महिलांच्या तुलनेत दुप्पट संख्येत पुरूषांनी आत्महत्या केल्या आहेत.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH2019/0224064

मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers

महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)

पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)